Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३६ ]  शुक्रवार, ऑक्टोबर १४, २०२२/आश्विन २२, शके १९४४  [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२२.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

### आदेश

क्रमांक कक्ष-१९-जिप-पंस-ग्रापनि-कावि-२०४९-२०२२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती अंतर्गत ग्रामविकास विभागाचे पत्र क्रमांक जिपनि २०२१-प्र. क्र. ११८-पं.रा.-२, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण यामधील महिलांसह खालीलप्रमाणे एकूण पंचायत समिती सभापती पदे निश्चित करून दिलेली आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. | प्रवर्गाचे नाव | पद संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अनुसूचित जाती | १ पद |
| २ | अनुसूचित जाती महिला | १ पद |
| ३ | अनुसूचित जमाती महिला | १ पद |
| ४ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | १ पद |
| ५ | सर्वसाधारण | १ पद |
| ६ | सर्वसाधारण महिला | २ पद |

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २ (फ) च्या तरतुदींअन्वये मी, निमा अरोरा, भाप्रसे, जिल्हाधिकारी, अकोला याद्वारे १७ जुलै, २०२२ पासून उर्वरित अडीच वर्षाच्या कालावधीसाठी पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी जाहीर पंचायत समिती

सभापती आरक्षण सोडतीत खालील नमूद रकाना क्र. (२) मधील पंचायत समितीस, रकाना क्र. (३) मधील जागेचे आरक्षण निश्चित करून अधिसूचित करित आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. (१) | प्रवर्गाचे नाव (२) | पंचायत समितीचे नाव (३) |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | मुर्तीजापूर |
| २ | अनुसूचित जाती महिला | तेल्हारा |
| ३ | अनुसूचित जमाती महिला | अकोला |
| ४ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला | पातूर |
| ५ | सर्वसाधारण | बाळापूर |
| ६ | सर्वसाधारण महिला | बार्शिटाकळी |
| ७ | सर्वसाधारण महिला | अकोट |

उपरोक्त नमूद पंचायत समितीचे सभापती पदाकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ह्या प्रवर्गामधील निवडून आलेले सदस्य उपलब्ध नसल्यास त्या सभापती पदाबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील २ फ (६) च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**निमा अरोरा** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
अकोला.

अकोला :
दिनांक १३ ऑक्टोबर २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.